MAHARASTRA
ELECTION
2024

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

Lubi Pumps
ओपनवेल, मोनोब्लॉक पम्पसेटस्
गुरुगणेश एंटरप्रायजेस - सोलापूर
94235 90463 / 94235 88463

www.surajyadigital.com । बुधवार, दि. १६ ऑक्टोबर २०२४ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : १९ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# बिगूल वाजला...किसमें कितना है दम

## २० नोव्हेंबरला होणार

## दूध का दूध, पानी का पानी



**सोलापूर/विशेष प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून राज्याचे लक्ष लागून असलेल्या महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक जाहीर झाली असून २० नोव्हेंबरला राज्यात एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. विधानसभेसाठी राज्यात एकाच टप्प्यात निवडणूक होणार असून २२ ऑक्टोबरपासून उमेदवारी अर्ज भरण्यास प्रारंभ होणार आहेत.निवडणुकीची पुंगी वाजल्यानंतर राजकीय नेत्यांची झोप उडाली आहे.राज्यात यंदाची ही निवडणूक टर्निंग पाईंट असणार आहे.सत्ताधारी महायुती आणि विरोधी पक्षात असलेल्या महाविकास आघाडी यांच्यात दुरंगी लढत होणार आहे. तिसऱ्या आघाडीचा पर्याय उभा करण्यात आला आहे पण त्यांची म्हणावी तितकी ताकत दिसत नाही.तिसरी आघाडी मोडून पडली तर महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यातच घमासान होणार यात शंकाच नाही.

राज्यात २८८ जागांसाठी निवडणूक होईल.गेल्या वेळी म्हणजेच २०१९मध्ये भाजप-शिवसेना युती आणि दोन काँग्रेसची आघाडी यांच्यात लढत झाली होती.२०१४ प्रमाणे २०१९च्या निवडणुकितही राज्याने युतीच्या पारड्यात बहुमताचा कौल टाकला होता मात्र,मुख्यमंत्रीपदावरून भाजप आणि उद्धव ठाकरे यांच्यात ताणाताणी झाली.बहुमत मिळवूनही महिनाभर सत्ता स्थापन न केल्याने या संधीचा फायदा शरद पवार यांनी उचलला आणि उद्धव यांना जवळ केले.इतकेच नाही तर चक्क मुख्यमंत्रीपदाची ऑफर टाकरे यांना देवून टाकली. आलेली संधी सोन्याची समजून ठाकरे यांनी पवारांशी घरोबा केला.पण काँग्रेसचा त्याला विरोध होता.पवारांनी दिल्ली गाठून ठाकरे आपल्या सोबत आल्यास आपली सत्ता कशी स्थापन होईल हे पटवून दिले आणि ठाकरेंना सोबत घ्याला मॅडमनी हिरवा कंदील दाखवला. त्यामुळे काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांना हाताची घडी तोंडावर बोट ठेवावे लागले.

पवारांच्या या किमयेने राज्यात महाविकास आघाडीचा जन्म झाला आणि त्याचे शिल्पकार म्हणून पवार यांचे नाव आघाडीवर कोरले गेले. दोन वर्षे आघाडीचा सत्तेचा संसार सुखाचा चालला पण इकडे देवेंद्र फडणवीस हे ठाकरे यांच्यावर चिडून होते. कारण सलग दुसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदाचा तोंडाशी आलेला घास निघून गेला. तिथूनच आघाडीच्या सत्तेला सुरूंग लावण्याचा डाव फडणवीस यांच्या डोक्यात घोळू लागला. भाजपचे दिल्लीश्वरही ठाकरे यांच्यावर खार खावून होते. अडीच वर्षांनी आघाडीच्या सत्तेला सुरूंग लावण्यात भाजप नेते यशस्वी झाले. उद्धव ठाकरे यांचे अनेक वर्षांचे विश्वासू असणारे एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपदाची ऑफर देताच शिंदे हे उद्धव यांचे ५० आमदार घेवून बाहेर पडले. पहिल्यांदा भाजप-शिंदे गटाची सत्ता आली पण भाजप नेते पवारांवरही चिडून होते. पवारांचा पक्षही त्यांना फोडायचा होता.तेही त्यांनी साध्य करून दाखवले.अजितदादा यांच्यासह दहा आमदार आपल्याकडे खेचून घेतल्याने महायुतीचा पाळणा हालला.

### ● पुलाखालून पाणी वाहिले...

महायुतीच्या सत्तेत गेल्या अडीच वर्षात पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे.मराठा-ओबीसी आंदोलनाची धग या या सरकारला पचवावी लागली. दरम्यानच्या काळात सहा महिन्यांपूर्वी लोकसभेची निवडणूक झाली आणि पारडे अचानक फिरले. मराठी जनतेने आपला कौल महाविकास आघाडीच्या पारड्यात टाकला. महायुतीला मोठा फटका बसला.लोकसभेला बूस्टर डोस मिळाल्याने आघाडीच्या नेत्यांनी महायुतीच्या नेत्यांना पुरते गुच्चे लगावले.त्याने महायुतीचे पेकाडच मोडले.बूस्टर डोसने आघाडीच्या नेत्यांनी विधानसभेसाठी जबरदस्त मोठ बांधायला सुरूवात केली आहे तर त्याला शह देण्यासाठी महायुतीच्या सरकारने गेल्या आठवडाभरापासून कोटींच्या कोटी निधी देण्याचा सपाटा लावला आहे तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे वातावरण महायुतीच्या बाजूने फिरल्याचा राजकीय जाणकारांचा अंदाज आहे.या साऱ्या पार्श्वभूमीवर विधानसभेचे मैदान गाजणार आहे.

### ● तीन तिघाड, काम बिघाड...

महायुती आणि महाविकास आघाडीत तीन-तीन पक्ष आहेत.त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात जागा वाटपाचा मोठा घोळ आहे. गोंधळात गोंधळही सुरू आहे. त्यामुळे तीन तिघाड-काम बिघाड असे चित्र दिसत आहे. येत्या मंगळवारपासून अर्ज भरण्यास प्रारंभ होणार आहे. ४ नोव्हेंबर अर्ज परत घेण्याची अंतिम मुदत आले.त्यामुळे वेळ खूप कमी असल्याने राजकीय पक्षांच्या हायकमांडना जागा वाटपाचा निर्णय लवकरात लवकर घ्यावा लागणार आहे. उमेदवाराचा चेहरा मतदारांसमोर लवकर आणावा लागणार आहे.

### ● सोलापुरात काय ?

सोलापूर जिल्ह्यात ११ अकरा विधानसभा मतदार संघ असून त्यात सोलापूर आणि माढा अशा दोन लोकसभा मतदार संघांचा समावेध आहे. सोलापुरात शहर मध्य, शहर उत्तर, माढा,दक्षिण सोलापूर, अक्कलकोट आणि मंगळवेढा-पंढरपूर आणि मोहोळ असे सहा तर माढा लोकसभा मतदार संघात माढा, माळशिरस, सांगोला आणि करमाळा (७+४) तर सातारा जिल्ह्यातील फलटण,माण-खटाव या मतदार संघांचा समोवश आहे.२०१९च्या निवडणुकीत भाजपने सोलापूर आणि माढ्याची जागा जिंकली होती मात्र नुकत्याच झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत दोनही ठिकाणी सफाया झाला.दोनही ठिकाणी महायुती व महाविकास आघाडीने आपली प्रतिष्ठा पणाला लावली आहे.कोण कुणाचे उमेदवार कसे असतील यावरच लढतीच चित्र मांडता येईल.

# राज्यात २० नोव्हेंबरला मतदान, २३ला मतमोजणी

**सोलापूर/प्रतिनिधी**

**विधानसभेच्या निवडणुकीची घोषणा केंद्रीय निवडणूक आयोगाकडून मंगळवारी करण्यात आली. त्यानुसार २० नोव्हेंबरला एकाच टप्प्यात राज्यभर मतदान होणार आहे.**

केंद्रीय निवडणूक आयोगाकडून महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकांच्या तारीखा जाहीर करण्यात आल्या. महाराष्ट्रात एकूण ९.६३ कोटी मतदार असून त्यासाठी १ लाख १८६ मतदार केंद्रावर मतदान होणार आहे. मतदानाची पूर्ण प्रक्रिया ही व्हिडीओ रेकॉर्ड होणार आहे.

ज्येष्ठ नागरिकांसाठी, ज्यांचं वय ८५ पेक्षा जास्त आहे त्यांना त्यांच्या घरातूनच मतदान करण्याची सुविधा प्राप्त करून देण्यात येणार आहे. त्यासाठी त्यांना निवडणूक आयोगाचा एक फॉर्म भरावा लागणार आहे.

महाराष्ट्रामध्ये महायुतीमध्ये भाजप, एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि राष्ट्रवादीचे अजित पवार हे एका बाजूला असतील. दुसरीकडे काँग्रेस, ठाकरेंची शिवसेना आणि राष्ट्रवादीचे शरद पवार हे असतील.

### असा आहे कार्यक्रम

- निवडणुकीचे नोटिफिकेशन : २२ ऑक्टोबर २०२४
- अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख : २९ ऑक्टोबर
- अर्जांची तपासणी : ३० ऑक्टोबर
- अर्ज मागे घेण्याची तारीख : ४ नोव्हेंबर
- मतदान : २० नोव्हेंबर २०२४
- मतमोजणी : २३ नोव्हेंबर २०२४

### २८८ जागांसाठी किती मतदार असतील ?

- एकूण मतदार - ९ कोटी ६३ लाख
- नव मतदार - २०.९३ लाख
- पुरूष मतदार - ४.९७ कोटी
- महिला मतदार - ४.६६ कोटी
- युवा मतदार - १.८५ कोटी
- तृतीयपंथी मतदार - ५६ हजारांहून जास्त
- ८५ वर्षावरील मतदार - १२. ४८ लाख
- शंभरी ओलांडलेले मतदार - ४९ हजारांहून जास्त
- दिव्यांग मतदार - ६.३२ लाख

### महाराष्ट्रात किती मतदान केंद्र ?

- एकूण मतदान केंद्र - १ लाख १८६
- शहरी मतदार केंद्र - ४२,६०४
- ग्रामीन मतदार केंद्र - ५७,५८२
- महिला अधिकाऱ्यांची केंद्रे -
- एका मतदान केंद्रावर सरासरी मतदार - ९६०

### मतदारांसाठी सुविधा पोर्टल ॲप

निवडणूक आयोगाच्यावतीने सुविधा पोर्टल नावाने ॲप जारी करण्यात आलं आहे. या एप्लिकेशन्सवर मतदारांना तक्रार करता येणार आहे. एखाद्या ठिकाणी काही घटना घडली किंवा उशीरापर्यंत मतदान सुरु असेल तर केवळ फोटो काढून या एप्लिकेशन्सवर अपलोड केला की, ९० मिनिटांत निवडणूक आयोगाची टीम तिथं पोहचेल असे निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितले.

### एटीएमसाठी पैसे घेऊन जाणाऱ्या वाहनांवर निर्बंध

एटीएमसाठी पैसै घेऊन जाणाऱ्या गाडीला निवडणूक काळात रात्री ६ ते सकाळी ८ पर्यंत पैसे वाहतूक करता येणार नाही. राज्यातील पैसा, ड्रग्ज आणि दारुच्या वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यात येईल. याकाळात अँब्युलन्स, बँक आणि पतसंस्था यावर देखील लक्ष ठेवलं जाईल. १७ सी कॉपी पोलिंग एजंटला मतदान संपताच दिले जातील. यावर किती मतदान झालं याची माहिती असेल. सोशल मीडियात फेक, डीफ फेक प्रकार घडला तर कडक कारवाई होईल.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आजपासून मी तुझ्या कोणत्याच मागण्या पूर्ण करू शकणार नाही!

| कल्याण |
|---|
| 788-35-168 |

| मुंबई |
|---|
| 157-39-135 |

# पाणी भरण्याच्या कारणावरून लाथाबुक्क्याने मारहाण

## मोदी येथील घटना; २ महिला जखमी

**सोलापूर/प्रतिनिधी**

सार्वजनिक नळावर पाणी भरण्याच्या कारणावरून झालेल्या मारहाणीत दोन महिला जखमी झाल्या. ही घटना मोदी परिसरातील जयशंकर तालीम जवळ सोमवारी रात्रीच्या सुमारास घडली.

निर्मला शिवराम गंटू (वय ५० रा. कोनापुरे चाळ) असे जखमी झालेल्या पहिल्या गटातील महिलेचे नाव आहे. काल रात्री १० वाजेच्या सुमारास तालीम जवळील नळावर पाणी भरत होती. त्यावेळी झालेल्या भांडणात बालराज वाघमारे, अभिषेक वाघमारे आणि इतर दोघांनी मिळून तिला मारहाण केली. त्यात ती बेशुद्ध झाली. श्रीनिवास वाघमारे (भाचा) यांनी दिला शासकिय रुग्णालयात दाखल केले. दुसऱ्या घटनेत उमा बालराज वाघमारे (वय ४० रा.जय शंकर तालीम) असे जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. त्याच कारणावरून तिला पूजा गंटू ,नीता वाघमारे आणि अन्य एकाने मिळून मारहाण केली. अशा नोंदी सदर बाजार पोलिसात झाले आहेत.

अस्सल सोलापुरी
सुराज्य
सोलापूर
चा
विषय लई हार्ड हाय!
अस्सल सोलापुरी
सुराज्य
सोलापूर
कडं
इलेक्शनचं पान हाय!
उद्यापासून
दररोज
धक्का!!
आपला अंक आजच राखून ठेवा,
नजिकच्या विक्रेत्यांना भेटा !